## कथा -१०

# <-:तोळ्यांची कहाणी-:>

कावून कि, त्या माणसाची दशा ज्यानं परदेश जातांना आपल्या दासांना बलावून आपली समपत्ती सोपुन देली त्या प्रमाणे हायत्यांन एकाले पाच हजार रुपये अन् एकाले दोन हजार रुपये अन् एकाले एक हजार रुपये असे त्यायचा योग्य ते प्रमाणे देले,अन् तवा तो गावी गेला.ज्यालें पाच हजार रुपये भेटले होते,त्यानं लगेचं जाऊन व्यापार केला,अन् पाच हजार रुपयें अजूक कमावले.अशाच प्रकारे ज्याले दोन हजार रुपये भेटले होते,त्यांनहि अजुक दोन हजार रुपये कमावले.पण ज्याले एक हजार रुपये भेटले होते त्यांन जाऊन जमिनीत रोवून टाकले लपून ठेवले.बऱ्याचं दिवसानंतर त्याच्यावाला धनी घरी येऊन त्यायचा लेखा जोखा घेऊ लागला.ज्याले पाच हजार रुपये दिले होते,त्यांन पाच हजार अजुक आणून म्हणले हे स्वामी तू मले पाच हजार रुपये दिले होते, पाहा मी अजुक पाच हजार रुपये कमावले हाय.त्याच्या धन्यानें त्यालें म्हणलं,धन्य हायसं चांगल्या अन् विश्वासयोग्य दासां तू थोडंशाकं मध्ये विश्वास योग्य रायला,मी तुले बऱ्याचं वस्तूवर अधिकारी बनवतो आपल्या स्वामीच्या आनंदात सहभागी हो.अन् ज्यालें दोन हजार रुपयें भेटले होते,त्यानं पण येऊन म्हणलं,हे स्वामी पाह्य,तू मले दोन हजार रुपयें देलें होतें,मी दोन हजार आजूक कमावले.
त्याच्या वाल्या धान्याने त्याले म्हणलं, धन्य हायसं खऱ्या चांगल्या विश्वास योग्य दासां थोडंसाक विश्वासयोग्य रायला,मी तुले बऱ्याचं वस्तूवर अधिकारी बनवीन आपल्या धन्याच्या आनंदात सहभागी होऊन जाय.तवा ज्याले एक हजार रुपये भेटले होते, त्यानं येऊन म्हणलं हे स्वामी मले मालूम हाय कि तू कठोर माणूस हायसं, जती तू पेरले नाई, ततीसाकं कापणी करतोस,अन् जतुन पसरवलं ठेवले होते ततून गोळा करतो म्हणून मी भेलो अन् जाऊन, एक हजार रुपये मी जमिनीत खोदुन लपून ठेवले होते,परत ते तुमचे तुमाले भेटले.तवा त्याच्या धन्याने त्याले उत्तर देलं, हे दृष्ट अन् आलसी दासां जती मी पेरले नाईत तती कापतो अन् पसरून ठेवले नाईत ततून गोळा करतो हे तुले ठावूक होते काय?तर माह्याले रुपये सावकारापासी ठेवायचे म्हणनें,मी येऊन व्याजा सगट वापीस मिळाले असते.म्हणून ते ज्यालें थोड्सक देलं हाय,वापस घ्या अन् ज्याच्या पासी दहा हजार रुपये हायत, त्याले त्यालें द्या.
कावून कि ज्याच्या पाशी लयमोठं होईण,त्यालें देलं अन् त्यालें भरपूर देलं जाईन,अन् जा कोना पासी नाई त्याच्या जवळ जे असीन ते पण त्याच्या पासून कादून घेतलं जाईन.अन् त्या निकम्या निरुपयोगी दासाले, बायर अंधारात टाका,जती रडणं दात वासनं राईन दात खाने राईन.

---